ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

ATTESTED

PRINCIPAL
K.K.Wagh Arts, Com. Sc. & Comp. Science College,
CHANDORI, Tal.Niphad, Dist.Nashik-422 201.

EDITOR IN CHIEF
Dr. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR 1:0086

ISSN -2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Vol. - II, Issue - XI
Year - VI (Half Yearly)
Sept. 2015 To Feb. 2016

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

Website
www.irasg.com

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

Publisher :
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

EXECUTIVE EDITORS

Dr. Suhas Avhad
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. Sadanand H. Gone
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery
Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

DEPUTY-EDITOR

Dr. Balaji S. Bhure
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

CO-EDITORS

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

Vol. II, Issue : XI
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 1.0086
ISSN 2229-4406
Sept. 2015 To Feb. 2016

INDEX

Sr. No.	Title of Research Paper	Author(s)	Page No.
1	An Assessment of Maharashtra Employment Guarantee Scheme as A Tool of Poverty Alloviation	Dipak Chaudhari, Dr. Ashok Khachane	1-7
2	India's Trade with Saarc Countries	Kirankumar D. Thorat	8-11
3	Inflation : A Challenges Before Indian Economy	Dr. Suhas Avhad, Mohan B. Shinde	12-16
4	महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व ९७ वी घटना दुरुस्ती	डॉ. सुहास आव्हाड	17-19
5	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) - एक दृष्टीक्षेप	दत्तात्रय धनू गव्हाणे	20-22
6	अनुसूचीत जातीच्या समस्या	कविता होन	23-25
7	भारताच्या आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीची भुमिका	डॉ. आर. के. दातीर, दिनायक त. खातळे	26-29
8	महाराष्ट्रातील पंचायत राजची ५० वर्ष	सुहास सुदाम क्षिरसागर	30-32
9	ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्येतील वाढ व समस्या	डॉ.प्रमोदिनी कदम, मंगल जगताप	33-36
10	स्वातंत्र्योत्तर काळातील शेतीची वाटचाल	बाळासाहेब जयराम जाधव	37-41

URA Vol. II, Issue : XI
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 1.0086
ISSN 2229-4406
Sept. 2015 To Feb. 2016

7.

भारताच्या आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीची भुमिका

डॉ. आर. के. दातीर
अर्थशास्त्र विभाग,
के.टी.एच.एम.महाविद्यालय,
नासिक, जि. नाशिक

विनायक त. खातळे
संशोधक विद्यार्थी

Research Paper - Economics

प्रस्तावना:

भारत हा विकसनशील देश आहे. त्यामुळे भारतात मोठया प्रमाणात भांडवलांची कमतरता आहे. भांडवलाशिवाय कोणत्याच देशाचा विकास होऊ शकत नाही. भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला आणि तेव्हापासुनच उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतीकीकरण या त्रिसुत्रीचा भारताने स्विकार केला आहे. आणि भारतात खऱ्या अर्थाने परकीय गुंतवणुकीला चालना १९९१ नंतरच मिळाली. भारत आज परकीय गुंतवणुकीचे एक महत्वाचे केंद्र वनले आहे. सध्या भारत देशाकडे मोठया प्रमाणावर परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक आकर्षित होत आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. भारतास विविध देशांकडून प्राप्त होणा-या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा अभ्यास करणे.
२. भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या क्षेत्रनिहाय विभागणीचा अभ्यास करणे.
३. भारतात राज्यनिहाय होणा-या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा अभ्यास करणे.

संशोधनाचे गृहितक :

१. भारताच्या आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीने मोलाची भुमिका बजावली आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती गोळा करण्यासाठी व्दितीयक स्त्रोताचा आधार घेतला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला आहे व त्यासाठी निदानात्मक संशोधन आराखडयाचा

वापर केला आहे.

भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक :

भारत सध्या परकीय गुंतवणुकीचे महत्वाचे एक स्थान बनले आहे. ऑगस्ट १९९१ मध्ये केंद्र सरकारने स्विकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणामुळे देशात परकीय तंत्रज्ञान व परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा मार्ग सुलभ झाला आहे. विदेशी गुंतवणुक ही दोन मार्गानी होत असते. एक देयता निर्माण करणारे भांडवलं ज्यात अनिवासी भारतीयाच्या ठेवी (NRI) व विदेशी कर्ज यांचा समावेश होतो. दुसरे देयता निर्माण न करणारे भांडवलं यामध्ये परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक व परकीय संस्थात्मक गुंतवणुक यांचा समावेश होतो. परकीय संस्थात्मक गुंतवणुक ही शेअर मार्केटमध्ये केली जाते. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादनात वाढ होत नाही. मात्र परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे प्रत्यक्षात उत्पादनात वाढ होते.

भारतास प्राप्त परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक :

वर्ष	FDI (कोटी रु. मध्ये)	FDI (दशलक्ष डॉलरमध्ये)
२००४-०५	१७,१३८	३,७५५
२००५-०६	२४,६१३	५,५४९
२००६-०७	७८,६३०	१५७३०
२००७-०८	९८,६६४	२४,५७९
२००८-०९	१,२२,९१९	२७,३२९
२००९-१०	१,२३,१२०	२५,८३४
२०१०-११	९७,३२०	२१,३८३
२०११-१२	१,६५,१४६	३५,१२१

स्त्रोत:- रंजन कोळंबे - भारतीय अर्थव्यवस्था

वरील तक्त्यामध्ये २००४-०५ ते २०११-१२ या वर्षात भारतास प्राप्त झालेली परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीची रक्कम दर्शवली आहे. २००४-०५ मध्ये भारतास FDI १७,१३८ कोटी रु. प्राप्त झाली होती. त्यामध्ये वाढ होऊन २०११-१२ मध्ये १,६५,१४६ रु. कोटी झाली. २००४-०५ मध्ये भारतास FDI ३,७५५ दशलक्ष डॉलर प्राप्त झाली होती. त्यामध्ये वाढ होऊन २०११-१२ मध्ये ३५,१२१ दशलक्ष डॉलर प्राप्त झाली होती.

FDI ची क्षेत्र-निहाय विभागणी :

अ.क्र.	क्षेत्र	२०११-१२ (दशलक्ष $)	एप्रिल २००० ते नोव्हे. २०१२ (दशलक्ष $)	एकुण पैकी टक्केवारी
१	सेवा क्षेत्र (वित्तीय व बिगरवित्तीय)	५,२१६	१,६५,७७२	१९%
२	बांधकाम विकास	३,१४२	२१,७६६	१२%
३	दूरसंचार	१,९९७	१२,६२३	७%
४	कॉम्प्युटर सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर	७९६	११,५५१	६%
५	ड्रग्ज व औषधे	३,१३२	९,७७६	५%
६	बीज क्षेत्र	१,६५२	७,७५५	४%
७	ऑटोमोबाईल	९२३	७,५१८	४%

स्त्रोत:- Economic Survey of India २०११-१२

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, एप्रिल २००० ते नोव्हेबर २०१२ दरम्यान सर्वाधिक FDI सेवा क्षेत्रात (वित्तीय व बिगरवित्तीय सेवा) या क्षेत्रामध्ये प्राप्त झाली तर त्या खालोखाल बांधकाम या क्षेत्रामध्ये प्राप्त झाली.

एकुण FDI मधील गुंतवणुक देशांचा हिस्सा:-

एप्रिल २००० ते नोव्हे. २०१२ दरम्यान भारतात झालेल्या एकुण FDI पैकी पहिल्या १० देशांचा हिस्सा पुढील प्रमाणे

अ. क्र.	देश	२०११-१२ (दशलक्ष $)	एप्रिल २००० ते नोव्हे. २०१२ (दशलक्ष $)	एकुण पैकी टक्केवारी
१	मॉरिशस	९,९४२	७१,३७८	३८ %
२	सिंगापुर	५,२५७	१८,६६१	१०%
३	इंग्लंड	७,८७४	१७,०८३	९%
४	जपान	२,९७२	१३,८७८	७%
५	यु.एस.ए.	१,११५	१०,९४१	६%
६	नेदरलॅंड	१,४०४	८,२०८	४%
७	सायप्रस	१,५८७	६,७४१	४%
८	जर्मनी	१,६२२	५,०९२	३%
९	फ्रान्स	६६३	३,३९६	२%
१०	यु.ए.ई	३५३	२,३५९	१%

स्त्रोत:-SIA Newsletter and Economic Survey २०१०-११

एकुण FDI मधील गुंतवणुक राज्यांचा हिस्सा

एप्रिल २०००ते नोव्हे. २०१२ दरम्यान RBI च्या प्रादेशिक कार्यालयांच्या प्रक्षेत्रात प्राप्त झालेल्या परकीय प्रत्याक्ष गुंतवणुकीची विभागणी हिस्सा पुढील प्रमाणे

अ.क्र.	RBI चे प्रादेशिक कार्यालय	राज्ये	हिस्सा
१	मुंबई	महाराष्ट्र, दादरा नगर हवेली दीव-दमण	३३ %
२	नवी दिल्ली	राष्ट्रीय राजधानी क्षेत्र	१९%
३	बंगलोर	कर्नाटक	६%
४	अहमदाबाद	गुजराथ	५%
५	चेन्नई	तामिळनाडू	५%
६	हैद्राबाद	आंध्रप्रदेश	४%

स्त्रोत:- रंजन कोळंबे - भारतीय अर्थव्यवस्था

वरील तक्त्यामध्ये RBI च्या प्रादेशिक कार्यालयनिहाय FDI चा प्रवाह टक्केवारीमध्ये दर्शविला आहे. भारतात FDI मोठया प्रमाणात होत असली तरीही राज्यानुसार त्याचे प्रमाण असमतोल आहे. त्यामुळे भारतातील सर्व राज्याच्या समतोल आर्थिक विकास झालेला नाही.

निष्कर्ष आणि शिफारशी :

१९९१ नंतर FDI चा प्रवाह भारतात वाढल्यामुळे भारताची निर्यात मोठया प्रमाणावर वाढली आहे. म्हणुन भारतात भविष्यात अधिक FDI होण्यासाठी गुंतवणुकीला असुन अनुकुल वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. सध्या जगात ब्रिक्स (BRICS) ब्राझील, रशिया, इंडीया, चीन, दक्षिण आफ्रिका या देशाचा समावेश आहे. आर्थिक विकास गुंतवणुक, रोजगार, निर्यात यामध्ये बिक्स देशात मोठया प्रमाणात वाढ होत आहे.

संदर्भ सूची

१) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, जंगले मंगला, प्रशांत पब्लिकेशन.

२) भारतीय अर्थव्यवस्था, कोळंबे रंजन, भगीरथ प्रकाशन.

३) अर्थसंवाद, एप्रिल-जुन २०१२.

४) Economic Survey of India-२००९-१०, २०१०-११, २०११-१२.

५) RBI Monthly Bulletin, june २००९,

६) Indian Economy, Datt & Sundaram.

७) Indian Economy, Gaurav Datta and Ashawani Mahajan